(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

सर्वोच्च न्यायालय अहवाल - [ १९९६] २ एस. सी. आर - २२४-२२६

दिवाणी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपिल क्र. २१९४/१९७७ इत्यादी

श्रीमती फिरदोश फातिमा (मृत) इत्यादी.

विरुद्ध

श्रीमती फिरदोश बेगम (मृत) आणि इतर. इत्यादी.

६ फेब्रुवारी १९९६

[के. रामास्वामी, बी. एल. हंसारिया आणि जी. बी. पटनायक, न्यायमूर्ती]

यु.पी. उच्च न्यायालय (लेटर्स पेटंट निर्मूलन) अपील कायदा, १९६२/उत्तर प्रदेश सुधारणा अधिनियम ३३/१९७२ :

कलम ४—विचारार्थ घेण्याची शक्ती — दिनांक १७.३.१८६६ च्या लेटर्स पेटंटच्या खंड (१०) सह उत्तर प्रदेश उच्च न्यायालयाच्या (एकत्रीकरण) आदेश, १९४८ च्या खंड (१७) अन्वये लेटर्स पेटंट अपीले — काढून घेण्यात आले — यापुढे कायदेशीर केस नाही—दुरुस्ती कायदा

आधीच कायम करण्यात आला आहे.

हसीनुद्दीन खान आणि इतर. वि. उपसंचालक, एकत्रीकरण आणि इतर, [१९८०]३ एस. सी. सी. २८५ मधील न्यायनिर्णय अनुसरला.

मुंबई राज्य विरुद्ध नरोथमदास जेठाबाई व दुसरी व्यक्ती, [१९५१] एस. सी. आर ५१; राम अधेर सिंह वि: रामरूप सिंह आणि इतर,[९६८] २ एस. सी. आर ९५; भारताचे संघराज्य वि. मोहिंदरा पुरवठा कंपनी, [१९६२] ३ एस. सी. आर ४९७ आणि हकीम सिंग विरुद्ध शिवसागर आणि इतर, ए. आय. आर. (१९७३) अलाहाबाद ५९६, यांचा संदर्भ घेतला.

दिवाणी अपिलीय अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक २१९४/१९७७ इ.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने एस.ए.क्र. १२९/१९७५ मध्ये दिनांक ११.४.७७ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

एस. के. ढोलकिया, पी. के. जैनसाठी असीम मेहरोत्रा, एस. के. अग्निहोत्री, कु. बीना गुप्ता, ए. एस. भस्मेतर्फे एस. एम. जाधव, एस. के. जैन, रणधीर जैन, ए. एस. पुंडीर, एस. के. गंभीर, प्रमोद स्वरूप, एच. के. पुरी यांनी उपस्थित पक्षकारांची बाजू मांडली.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला.

हकीम सिंग विरुद्ध शिव सागर आणि इतर, ए. आय. आर. (१९७३) अलाहाबाद ५९६ या

खटल्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाच्या निकाला विरोधात हे दोन अपील दाखल झाले आहेत. उत्तर प्रदेश राज्य विधिमंडळाने उत्तर प्रदेश उच्च न्यायालय (लेटर्स पेटंट नष्ट करणे,) अधिनियम, १९६२ मध्ये सुधारणा करणारा उत्तर प्रदेश सुधारणा अधिनियम क्र. ३३/१९७२ अधिनियमित केला आणि त्यातील कलम ४ लागू केले ज्यात खालीलप्रमाणे तरतूद आहे:

'उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाने काही प्रकरणांमध्ये रिट अधिकारक्षेत्राचा वापर करून दिलेल्या निर्णयातून किंवा आदेशातून निर्माण अपीले रद्द करणे. - (१) दिनांक १७ मार्च, १८६६ च्या सन्माननीय राणीच्या लेटर्स पेटंटमधील खंड १० सह उत्तर प्रदेश उच्च न्यायालय (एकत्रीकरण) आदेश, १९१८ किंवा इतर अधिनियमात काहीही विरोधी असले तरी, हे कलम लागू होण्यापूर्वी किंवा नंतर दाखल किंवा सुरू झालेल्या दाव्यातून किंवा कारवाईतून महसूल मंडळाने संयुक्त प्रांतजमीन महसूल कायदा, १९०१ किंवा उत्तर प्रदेश भाडेदारी कायदा, १९३९, किंवा उत्तर प्रदेश नागरी क्षेत्र जमीनदारी निर्मूलन आणि जमीन सुधारणा कायदा, १९५६ किंवा कुमाऊं आणि उत्तराखंड जमीनदारी निर्मूलन आणि जमीन सुधारणा अधिनियम, १९६० अंतर्गत किंवा संचालक, (एकत्रिकरण) [संचालक, (एकत्रिकरण) यांच्या शक्तींचा तथाकथित वापर करणाऱ्या आणि त्यांची कर्तव्य पार पडणाऱ्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो, यांनी उत्तर प्रदेश धारण जमिनींचे एकत्रीकरण अधिनियम १९५३ अंतर्गत पारित केलेला किंवा पारित करण्याचे अभिप्रेत असलेला न्याय निर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामधून उद्भवणारे कोणतेही अपील राज्यघटनेच्या

अनुच्छेद २२६ किंवा अनुच्छेद २२७ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारतेचा वापर करून उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निर्णयातून किंवा आदेशावरून उच्च न्यायालयात दाखल होणार नाही.

(२) उपकलम (१) मध्ये काहीही असले तरी, हे कलम लागू होण्याच्या तारखेच्या तत्काळ आधीच्या तारखेला उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या सर्व अपिलांची सुनावणी जणू हे कलम लागूच झाले नाही अशा पद्धतीने करून निकाली काढली जातील.

या कायद्याच्या लागू होण्यामुळे १७ मार्च १८६६ च्या लेटर पेटंटच्या खंड (१०) सह उत्तर प्रदेश उच्च न्यायालयाच्या (एकत्रीकरण) आदेश, १९४८ च्या खंड (१७) अन्वये त्यामध्ये नमूद विषयांवरील लेटर पेटंट अपीलावर सुनावणी घेण्याचा अधिकार काढून घेण्यात आला आहे. हा वाद आता अस्तित्वात राहिलेला नाही. या न्यायालयाने मुंबई राज्य विरुद्ध नरोथमादास जेठाबाई आणि दुसरी व्यक्ती,[१९५१] एस. सी. आर ५१, राम अधेर सिंग विरुद्ध रामरूप सिंग आणि इतर, [१९६८] २ एस. सी. आर ९५ आणि भारत सरकार विरुद्ध मोहिंदरा पुरवठा कंपनी, [१९६२] ३ एस. सी. आर ४९७ या प्रकरणांमध्ये घालून दिलेल्या कायद्याच्या आधारे या न्यायालयाच्या खंडपीठाने हसीनुद्दीन खान आणि इतर विरुद्ध उपसंचालक, एकत्रीकरण आणि इतर, [१९८०] ३ एस. सी. सी. २८५ या प्रकरणामध्ये यापूर्वीच हा अधिनिमाची वैधता कायम केली आहे. खरं तर, या न्यायालयाने मोहिंदरा पुरवठा कंपनी प्रकरणात १९६२ च्या कायद्याच्या कलम ३ ची वैधता कायम केली आहे.

त्यामध्ये पुढीलप्रमाणे निर्णय पारित केला आहे.

"त्यामुळे या कायद्यांना घटनाबाह्य या कारणास्तव दिलेले आव्हान फेटाळले जाते".

घटनापीठाच्या निर्णयामुळे हा वाद आता टिकून राहिलेला नाही. महसूल आणि भाडेदारी प्रकरणांच्या संदर्भात लेटर पेटंट अपील रद्द करण्याची कायदेशीर क्षमता या कायद्याच्या कलम ४ अंतर्गत समाविष्ट आहे. राज्यघटनेच्या सातव्या अनुसूचीतील राज्य सूची २ मध्ये यादी २ मधील प्रकरणांच्या संदर्भात उत्तर प्रदेश राज्यातील न्यायदान करणाऱ्या सर्व न्यायालयांचे अधिकारक्षेत्र आणि अधिकार यांच्याशी संबंधित नोंदी आहेत. त्यामुळे हा कायदा कायम होत आहे.

त्यानुसार अपील फेटाळले जाते. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

जी.एन. अपीले खारीज केली जातात.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**********

It would thus be clear that one of the conditions precedent to make a valid reference to the court is that the application under Section 18(1) shall be in writing and made within six weeks from the date of the award when the applicant was present either in person or thorough counsel, at the time of making of the award by the Collector under clause (a) of proviso to sub-section (2). The Collector, when he makes the reference, acts as a statutory authority.